# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 4634 /शि.वि./२०१५
दि.30 /०७/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- शैक्षणिक संस्था व शाळांच्या आवारात तंबाखु जन्य पदार्थाच्या वापरावरील निर्बंधाबाबत.**

संदर्भ :- १) शासन परीपत्रक क्र.संकीर्ण-२०१४/(७०/१४) एसडी -४ दि. ७ जूलै, २०१५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या सिगारेट व तंबाखुजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३ च्या अमंलबजावणीच्या अनुषंगाने सर्व शाळांच्या प्रवेशव्दारापासून १०० मी. परिघात तंबाखुजन्य पदार्थ विक्रीस बंदी घालण्याबाबतच्या सूचना संदर्भाधिन दि. २२.०२.२०११ च्या शासन परीपत्रकान्वये देण्यात आल्या आहे. जनहित याचिका क्र.९८/२०१३ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने सिगारेट व तंबाखुजन्य पदार्थ नियंत्रण कायदा , २००३ मधील कलम ६ ची अमंलबजावणी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये करण्याबाबत राज्य शासनास निर्देश दिलेले आहे. त्याला अनुसरून संदर्भिय शासन निर्णय प्राप्त झाला असून त्याची प्रत सोबत संलग्न केली आहे. त्यानुसार कार्यवाही करून कार्यपालन अहवाल कार्यालयास सादर करावा.त्यासोबत मुख्याध्यापकाचे खालील घोषणा पत्र तयार करून त्याचा फोटो कार्यालयास सादर करावा.

“............ शाळा, म.न.पा, नागपूर मध्ये कुठल्याही तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन होत नाही व तसेच शाळेच्या आवारात कुठलेही तंबाखूजन्य पदार्थ उपलब्ध नाहीत. आम्ही सिगारेट/बिडी चे अवशेष व तसेच तंबाखू खाऊन थुंकणे या बाबतीत शाळेच्या आवारात तपासणी केली असता आम्हांला सदर गोष्टी आढळून आल्या नाही.”

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :-

१. मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
२. सहा. आयुक्त, (सा.प्र.वि), म.न.पा., नागपूर

**शैक्षणिक संस्था व शाळांच्या आवारात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या वापरावरील निर्बंधाबाबत सुचना.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१४/(७०/१४) एसडी-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ०७ जुलै , २०१५

वाचा:- (१) केंद्र शासनाचा " Cigarettes and other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Reguation of Trade and Commerce Production, Supply and Distributer) Act, २००३ (३४ of २००३) "(सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३)

(२) शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एसएसएन २०१०/(२९७/१०) /माशि-२, दि.२२.२.२०११

**प्रस्तावना**

केंद्र शासनाच्या " Cigarettes and other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Reguation of Trade and Commerce Production, Supply and Distributer) Act, २००३ (३४ of २००३) " सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व शाळांच्या प्रवेशद्वारापासून १०० मी.परिघात तंबाखूजन्य पदार्थ विक्रिस बंदी घालण्याबाबतच्या सूचना संदर्भाधिन दि. २२/२/२०११ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. जनहित याचिका क्र.९८/२०१३ संदर्भात मा.उच्च न्यायालयाने सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा, २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये करण्याबाबत राज्य शासनास निर्देश दिलेले आहेत. याअनुषंगाने सदर सूचना व केंद्रशासनाच्या वरील नियमातील तरतुदी शासनाच्या पत्रान्वये संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात आल्या आहेत.

तंबाखूमुळे होणारे तरुणांचे मृत्यू ही एक टाळता येण्याजोगी गोष्ट आहे. भारतामध्ये दररोज २५०० लोक तंबाखूशी संबंधित आजारामुळे मृत्यू पडतात. Global Adult Tobacco Survey (GATS) च्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रामध्ये २.५ कोटी लोक तंबाखूचा वापर करतात. तंबाखूचा वाढता वापर आणि त्याच्या दुष्परिणामांमुळे जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक समस्या म्हणून घोषित केले आहे. जगामध्ये प्रत्येक वर्षी ५० लक्ष व भारतात अंदाजे १० लक्ष लोक तंबाखूमुळे होणा-या आजारांनी मृत्युमुखी पडतात. ह्रद्यरोग, तोंडाचा कर्करोग, फुफ्फुसाचे आजार तसेच इतर असंसर्गजन्य रोगांचे कारण तंबाखूचा वापर हे आहे. ग्लोबल युथ तंबाखू सर्वे नुसार भारतात १३ ते १५ वर्षे वयोगटातील

१४ % पेक्षा जास्त मुले तंबाखूचे सेवन करतात. लहान वयात तंबाखूची सवय लागल्याने हि सवय सोडणे कठीण जाते व यामुळे विविध असंसर्गजन्य आजार होण्याचा धोका असतो. ग्लोबल ॲडल्ट टोबाको सर्वे २००९-१० अनुसार महाराष्ट्र राज्यात ४२.५% पुरुष व १८.९% स्त्रीया तंबाखूचे सेवन करतात. शालेय विद्यार्थ्यांमध्ये व तरुणांमध्ये तंबाखूसेवनाचे वाढते प्रमाण हा चिंतेचा विषय आहे.

प्रत्येक वर्षी भारतामध्ये ५५०० विद्यार्थी तंबाखूसेवनाला सुरुवात करतात आणि १५ वर्षे वयाखालील ५ लक्ष विद्यार्थी व्यसनाधीन बनतात. तंबाखू उत्पादक कंपन्यांतर्फे विद्यार्थ्यांना लक्ष्य केले जाते. भारतामध्ये ८ वर्षे वयापासून मुलांमध्ये तंबाखूसेवनाची सुरुवात होते. तरुण मुलांचे संरक्षण जर समाजाला करता येत नसेल तर त्या समाजाला प्रगत समाज म्हणता येणार नाही. विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थ्यांच्या आहारी जाण्यापासून वाचविणे ही समाज, पालक, शिक्षक व शासन यांची एकत्रित जबाबदारी आहे.लहान मुले अनुकरणप्रिय असल्यामुळे पालक, शिक्षक व समाजातील वडिलधा-या मंडळींनीही तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ्यांच्या सेवनापासून दूर राहणे आवश्यक आहे.

तंबाखू वापरावर प्रभावीपणे नियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाने सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा, २००३ तयार केला आहे. शालेय विद्यार्थी तंबाखूच्या व्यसनांच्या विळख्यात सापडू नयेत यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेत तंबाखू नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. केंद्रशासनाच्या तंबाखू नियंत्रण कायदा २००३ च्या कलम ६ नुसार शैक्षणिक संस्थापासून १०० यार्डच्या आतमध्ये तंबाखूजन्य उत्पादनाची विक्री करण्यास बंदी करणे व शाळेमध्ये तंबाखूमुक्त वातावरण ठेवणे गरजेचे आहे.

तंबाखूच्या या धोक्यापासून विद्यार्थ्यांना वाचविण्यासाठी व निरोगी आणि तंबाखूमुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

**तंबाखू नियंत्रण कायदा २००३ ची महत्वाची कलमे खालीलप्रमाणे आहेत :-**

कलम ४ - शैक्षणिक संस्थांसह सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी आहे

कलम ६(अ) - तंबाखूविक्री लहान मुलांना आणि लहान मुलांकडून करून घेण्यास बंदी आहे.

कलम ६ (ब)- शैक्षणिक संस्थांपासून १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीस बंदी आहे व तसे शाळेच्या प्रवेशद्वारावर फलक लावणे बंधनकारक आहे.

वरील नियमांचे पालन न केल्यास रु. २००/- पर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

२. **याकरिता प्रत्येक शाळेने खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

i) खाली देण्यात आलेल्या नमुन्यात शाळेत धुम्रपान बंदीबाबत सूचना फलक लावणे

**सूचना चिन्हांचा तपशील-**

**आकृती अ आणि ब** – शाळेच्या प्रत्येक प्रवेशद्वाराच्या आत आणि प्रत्येक मजल्यावर, जीन्यासह तसेच प्रत्येक मजल्यावरील लिफ्टच्या प्रवेशद्वारावर लावलेले असणे आवश्यक आहे.प्रत्येक शाळेने त्यांच्या स्तरावर यासाठी समन्वय अधिका-याची नियुक्ती करावी.




अ)

तुम्हाला कुणी धूम्रपान करताना, तंबाखू खाताना दिसल्यास सूचना द्या

नाव:..................................

पद:..................................

दूरध्वनी..................................

ब)

ii) शाळेच्या प्रवेशद्वारावर- शाळांपासून १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंदिबाबतचे फलक लावणे (खाली दिलेल्या नमुन्यात)

**तंबाखूमुक्त शाळा**

या शाळेच्या १०० यार्ड परिसरात सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने विकण्यास बंदी आहे आणि तो २०० रुपये (दोनशे रुपये) दंडासह शिक्षापात्र गुन्हा आहे.

iii )संस्था प्रमुखांनी (मुख्याद्यापक/ प्राचार्य) यांनी खालील स्वाक्षरी केलेले घोषणापत्र फोटोसहित जिल्हा शिक्षण अधिका-यांना पाठवावे.

**"( शाळा /कॉलेज चे नाव, पत्ता) मध्ये कुठल्याही तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन होत नाही व तसेच शाळेच्या आवारात कुठलेही तंबाखूजन्य पदार्थ उपलब्ध नाहीत. आम्ही सिगारेट/बिडी चे अवशेष व तसेच तंबाखू खाऊन थुंकणे याबाबतीत शाळेच्या आवारात तपासणी केली असता आम्हाला सदर गोष्टी आढळून आल्या नाहीत"**

३. सदर बाबतीत लवकरात लवकर कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल शालेय शिक्षण विभागाच्या माहिती पोर्टलवर भरावा.त्याबाबत शासनाकडून वेळोवेळी आढावा घेतला जाईल. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ शकतो व शाळेस कारवाईस सामोरे जावे लागू शकते, याची नोंद घ्यावी.

४. शाळेच्या आवारात किंवा वर्गात शिक्षक व कर्मचारीवर्ग तंबाखू किंवा तंबाखूयुक्त पान, गुटखा किंवा तंबाखूजन्य पदार्थ खात असल्यास त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर होतो. विद्यार्थी त्याकडे आकर्षित होऊ शकतात. त्यामुळे शिक्षक व कर्मचारीवर्ग यांनी शाळांच्या आवारात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करु नये.

५. सदर कायदा व नियमातील वरील तरतुदी शिक्षण संचालक (प्राथमिक) व संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी सर्व शिक्षण अधिकारी व इतर संबंधितांच्या निदर्शनास आणून, त्यांना याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

६. सदर परिपत्रकात आदेशांच्या अंमलबजावणीसाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात येत आहे. याबाबतचा अनुपालन अहवाल आदेश निर्गमित झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत शासनास सादर करावा.

७. सर्व शिक्षण अधिकारी व शिक्षण निरीक्षक यांनी हे आदेश सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावेत व शाळांमध्ये त्याच्या अंमलबजावणीबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७०७१२५३४४१७२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35acb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2015.07.07 12:56:53 +05'30'

(र.ग.गुंजाळ)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
४) मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सचिव,
५) संचालक, माहिती व जनसंपर्कविभाग यांना व्यापक प्रसिध्दीसाठी
६) सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हारिषद.
७) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
८) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
११) सर्व शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई.
१२) सर्व गट शिक्षण अधिकारी
१३) शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने
१४) डॉ. रुपेश महाजन, हिलीस-सेखसारिया इन्स्टीट्युट फॉर पब्लीक हेल्थ, नवी मुंबई.
१५) निवड नस्ती, एसडी-४